

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना – Regd. NSK / 231 / 2015-2017
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरीत केला जातो.

किंमत १ रुपया

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ३६ वे | अंक ३ रा | १० मार्च २०१५

## श्री परशुराम पुरस्कार, वेद पुरस्कार प्रदान सोहळा

यंदा श्री परशुराम जयंती दि. २० एप्रिल रोजी आहे. या निमित्ताने श्री परशुराम पुरस्कार, वेद पुरस्कार प्रदान सोहळा रविवार दि. १९ एप्रिल २०१५ रोजी रात्रौ ९ वाजता श्री कालिदास कलामंदिर येथे साजरा करीत आहोत. याच कार्यक्रमात पं.विद्याधर गोखले प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेचे संगीत मदनाची मंजिरी हे नाटक आयोजित करीत आहोत. कार्यक्रमाचा संपूर्ण तपशील एप्रिल २०१५ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात येईल.

## सामुदायिक व्रतबंधन

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे सामुदायिक व्रतबंधन शुक्रवार दि. ८ मे २०१५ रोजी वैशाख कृ. ४ शके १९३७ सकाळी १०.५० वा. आयोजित करण्यात येत आहे. व्रतबंधन सोहळा संस्थेच्या चित्तपावन मंगल कार्यालयात उमामहेश्वर लेन, एकमुखी दत्तमंदिरासमोर, नाशिक–१ या ठिकाणी होईल. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संस्थेच्या ‘काका गद्रे मंगल कार्यालय’ गोळे कॉलनी, नाशिक याठिकाणी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सोय सर्व शाखीय ज्ञाती बांधवांसाठी आहे.

**वेळ : सकाळी १० ते १ व दुपारी ४ ते ८**

# चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा)

चित्तपावन ब्राह्मण संघ, महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा) तर्फे दर महिन्याचा मासिक कार्यक्रम २८/२/२०१५ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या मैत्रिणींचे कौतुक करावे वाटते, कारण बाहेर पाऊस पडत असूनसुद्धा कार्यक्रमास मोठ्या संख्येने मैत्रिणी हजर होत्य. मैत्रिणींचे आभार !

या कार्यक्रमास शीतल करंदीकर यांनी ॐकाराचे महत्त्व सर्व मैत्रिणींना सविस्तर सांगितले. ॐकाराची नियमित आवर्तने केल्याने होणारे परिणाम, मोठे आजार सुसह्य होणे, मनःशांती लाभणे, स्वतःमध्ये आत्मविश्वास वाढणे, रक्तदाब नियंत्रणात राहणे हे सोदाहरण समजावून सांगितले. ॐकाराच्या किती पद्धती आहेत व तो कसा करावा हे सांगितले व मैत्रिणींकडून करूनही घेतला. या नंतर मैत्रिणींच्या शंकांचे समाधान केले.

मागील महिन्यात घेतलेल्या स्पर्धेच्या विजेत्या ४ मैत्रिणींचे कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शीतल करंदीकर यांच्या हस्ते बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले. स्पर्धेविषयीचे मनोगत वासंती फाळके यांनी मैत्रिणींना सांगितले.

शीतल करंदीकर यांचे स्वागत पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन मंगला जोगळेकर यांनी केले. मैथिली गोखले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपस्थित मैत्रिणींचे व पाहुण्यांचे आभार सुनिता परांजपे यांनी मानले व पुढील महिन्याच्या कार्यक्रमासंबंधी निवेदन केले.

मंगला जोगळेकर, मैथिली गोखले, माधवी जोगळेकर, वासंती फाळके, स्मिता रानडे, जान्हवी नातू, सुनिता परांजपे या मैत्रिणींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

मार्च महिन्याचा कार्यक्रम शनिवार दि. २८/३/२०१५ रोजी काका गद्रे मंगल कार्यालय येथे तिसऱ्या मजल्यावर संध्याकाळी ५ वा. होईल. सौ. अनिता परांजपे या नेहमी परदेश गमन करीत असतात, त्यावेळी त्यांना अनुभवास आलेले परदेशी स्त्री व भारतीय स्त्री यांच्यात जाणवलेले रीतीरिवाज, संस्कृती, आहार, मानसिकता व दोन्ही स्त्रियांचे समाजातील स्थान, कार्यदक्षता या विषयीचे तौलनिक विचार यावेळी आपल्याला सांगणार आहेत.

या कार्यक्रमासाठी स्त्री संघटनांबरोबर देश-विदेशात प्रदीर्घ काम करण्याचा अनुभव असलेल्या सौ. अनिता परांजपे यांचे भाषण आयोजित करण्यात आले आहे. विषय – ''तजाकिस्थान, फिलिपिन्स, पाकिस्तान येथील स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन व त्यांचे भारतातील स्त्रियांच्या जीवनाशी तुलना'' असा आहे. हा विषय अतिशय रंजक असून माहितीपूर्ण आहे. तरी महिलांनी मोठ्या संख्येने हजर राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

मिहिर कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेक्शा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक. फोन : २५९०७५४

**ईमेल :** cvranade@gmail.com

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल : ०९४२२२४६८७८**

# चित्तपावन ब्राह्मण ज्येष्ठ नागरिक मंचाची मासिक सभा संपन्न

श्री परशुराम चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंचाची माहे मार्च २०१५ ची मासिक सभा दि. २६-३-२०१५ रोजी चौथ्या गुरुवारी दुपारी ४.३० वा. होईल. प्रत्येकाने आपण व आपल्या ओळखीच्या पुरुष ५५+ व महिला ५०+ यांना घेऊन यावे. सभा वेळेवर सुरू होते. येत्या सभेत कार्यकारिणी व पदाधिकारी यांची निवड होणार आहे, याची नोंद घ्यावी.

दि. २६-२-२०१५ रोजी झालेल्या सभेत श्री. अशोक घैसास यांनी कै. पु. ल. देशपांडे यांनी वीर सावरकर यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने जे भाषण केले होते ते वाचून दाखविले. तसेच श्री. दाणी यांनी गोपियुष या आयुर्वेदिक औषधाविषयी प्रास्ताविक स्वरुपाची माहिती दिली. श्री. धनंजय दातार यांनी व्याख्यात्यांचे तसेच सगळ्यांचे आभार मानले. सुरुवातीला कै. साने गुरुजींची प्रार्थना व शेवटी पसायदान होऊन सभा संपन्न झाली.

अधिक माहितीसाठी संपर्क : ९४०३५५६४६४

**- डॉ. कृ. भा. आपटे** (संयोजक)

# स्वर्गीय प्रा. अरुण वसंत दुगल स्मृती संगीत सभा

शनिवार दिनांक ११ एप्रिल २०१५ रोजी, सायंकाळी ६ वाजता ''काका गद्रे मंगल कार्यालय'', गोळे कॉलनी, नाशिक येथे स्व. प्रा. अरुण वसंत दुगल स्मृती संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ह्या अंतर्गत सुविख्यात गायिका डॉ. वरदा गोडबोले, ठाणे यांचे शास्त्रीय व नाट्यसंगीत गायन सादर होईल. डॉ. वरदा गोडबोले यांना किराना, आग्रा व ग्वाल्हेर घराण्यांची बहुविध व समृद्ध तालिम अनुक्रमे पं. ए. के. अभ्यंकर, पं. यशवंत महाले व पं. मधुकरबुवा जोशी यांसारख्या दिग्गज गुरुंकडून मिळाली असून नाट्यसंगीताचे विशेष शिक्षण त्यांनी श्रीमती माणिक वर्मा यांच्याकडून घेतले आहे. तसेच, पं. अजय पोहनकर, डॉ. सुशिलाताई पोहनकर व श्रीमती लीलाताई शेलार यांच्याकडूनही त्यांना बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ झाला आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सुप्रसिद्ध ''बालगंधर्व'' चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायनही केले असून ते अत्यंत रसिकप्रिय ठरलेले आहे.

कार्यक्रम विनामूल्य व सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत रसिकांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## फडके कुलसंमेलन २०१५

सर्व फडके कुलोत्पन्न बांधवांचे कुलसंमेलन आयोजित करण्याचे योजिले आहे. तरी सर्व फडके बंधू-भगिनींना विनंती आहे की त्यांनी या कुलसंमेलनासाठी काही सूचना असतील तर खालील क्रमांकावर संपर्क साधावा. अमेय फडके (डोंबिवली) - ७२०८४३५४९८, मकरंद फडके (नाशिक) - ९९२२६२६०७५

## अभिनंदन

आपल्या संस्थेचे सदस्य श्री. सुशिल सहस्त्रबुद्धे यांची पुतणी **सौ. स्नेहा विराज भिडे (सहस्त्रबुद्धे)** या एच.एस.बी.सी. पुणे येथे कार्यरत आहेत. कंपनीतर्फे विशेष उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना बेस्ट एम्प्लॉईज म्हणून किताब देऊन गौरविण्यात आले. संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा !

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १५५ | पराग चितळे<br>५, ब्रम्हांड अपार्टमेंट, हिरेनगर मागे, नाशिक-पुणे रोड, नाशिक-११<br>फोन : ०२५३-२२३६६२८, मो. ०९४२२७६१९२८ | ४-७-८७ | अत्री | ५.९ | एम.बी.ए. | ४५,००० (मासिक) |
| १६२ | सौरभ श्रीकांत छत्रे<br>प्लॉट नं. २/३, इंदिरा संकुल अपार्टमेंट, काळाराम मंदिरामागे, पश्चिम दरवाजा, मुठे लेन, पंचवटी, नाशिक-३. मो. ९९२२४३७७२८ | १२-३-८९ | काश्यप | ५.४ | एम.बी.ए. (फायनान्स) | १५,००० (मासिक) |
| १६३ | चिन्मय सुरेश कर्वे<br>प्लॉट नं. १६, श्री इच्छामणी सोसायटी, टागोरनगर, नाशिक-पुणे रोड, नाशिक-६. फोन : ०२५३-२४१२६१२<br>मो. ७५८८७००९४२, ९९६०६४५०३९ | ५-४-८८ | गार्ग्य | ५.८ | बी.ई. (केमिकल्स) | २८,००० (मासिक) |
| १६४ | हर्षद दिगंबर खरे<br>१/१ अनमोल व्हॅली, तिडकेनगर, उंटवाडी रोड, म्हसोबा पुलाजवळ, नाशिक-८. मो. ९४०३१६१३८१, ९४०४२१३६६७ | १-९-८६ | कौशिक | ५.७ | बी.ई. (इन्स्ट्रुमेंटल) | ५५,००० (मासिक) |
| १६५ | सिद्धार्थ सुधाकर लिमये<br>७ बी, मेघःशाम प्रसाद, डॉ. फडके हॉस्पिटल समोर, पारनाका, कल्याण (जि. ठाणे). फोन : ०२५१-२२०१६२१,<br>मो. ९९८७५६२२३८ | २८-५-८३ | कपि | ५.११ | एम.कॉम. | २०,००० (मासिक) |
| १६६ | आनंद परशुराम जोशी<br>प्लॉट नं. १४, फ्लॅट नं. १७६, लवकुस हौसिंग सोसा., महात्मानगर, नाशिक-७. मो. ९८५०२६५०९५ | २४-३-७४ | शांडिल्य | ५.५ | एस.एस.सी., आय.टी.आय. (ऑपरेटर) | १६,००० (मासिक) |
| १६७ | सौरभ प्रविण शिंत्रे<br>२२, इंदिरा हौ. सोसायटी, सद्‌गुरु हॉटेलच्या वरती, दत्तमंदीर स्टॉप नाशिकरोड, नाशिक-१. मो. ९९२१३९४९२९ | १८-१२-८५ | काश्यप | ५.६ | बी.कॉम. | १२,००० (मासिक) |
| १६८ | प्रतिक संजय केतकर<br>बी विंग, फ्लॅट नं. ८, सियाराम को.ऑ. सोसायटी, तारवालानगर, मेरी, नासिक-४. मो. ९३७३०४२३३३ | २१-६-८७ | गार्ग्य | ५.१० | १२ वी, मोल्डर | २३,००० (मासिक) |
| १६९ | मयुरेश प्रमोद नातू<br>४९४/६, पर्वती आनंदी बंगला मित्र मंडळ जवळ, पर्वती पुणे.<br>फोन : ०२०-२४४२१५५३, मो. ९८९००६३४९८ | १६-१-८३ | वशिष्ठ | ६.० | बी.कॉम, एम.बी.ए. | ३०,००० (मासिक) |
| १७० | भूषण संतोष प्रभुणे<br>११, श्रीकृपा, तिडके नगर, उंटवाडी रोड, दोंदे पुलाजवळ, नाशिक-८<br>मो. ९६८९७५९१४८ | १८-४-७९ | गार्ग्य | ५.६ | बी.कॉम. | ३३,००० (मासिक) |
| १७१ | प्रथमेश राजीव दिवेकर<br>फ्लॅट नं. १, सुवर्ण कलश सोसा, पाण्याच्या टाकीजवळ, महात्मा नगर, नाशिक-७. फोन : ०२५३-२३६५०६०, मो. ९८२२०९३७७६ | ११-२-८९ | वशिष्ठ | ५.६ | बी.ई. (आय.टी) एम.एस. | ५२०० डॉलर (मासिक) |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ७३ | पूर्वा श्रीकांत गोगटे<br>फुलचर नाका, आर.टी.ओ. नविन मागे, गोंदिया, महाराष्ट्र<br>मो. ९०४९८६१६३६, ९४२३६७४५९३ | १३-१-९० | वशिष्ठ | ५.२ | एम.टेक. (कॉम्प्यु सायन्स) | २८,००० (मासिक) |

## सण चैत्रगौरीचा

हासत नाचत, वाजत गाजत, चैत्रमास आला।
हिंदोळ्यावर झुलवूं या ग, चैत्र गोरीला ॥ १ ॥

नटुनी सजुनी वसंत आला, वृक्षवेलींना बहर आला।
कोकिळेचे कुजन चाले, त्याच्या स्वागता ॥ २ ॥
हिंदोळ्यावर.....

नववर्षाच्या पाडव्याला, गुढ्या तोरणे लावा ।
नवमी दिवशी रामजन्माचा, सोनेरी क्षण आला ॥ ३॥
हिंदोळ्यावर.....

पौर्णिमेचे दिवशी गौरिचा शृंगार करूया ।
पन्हें कोशिंबीर अर्पूनी, औक्षण करूया ॥ ४ ॥
हिंदोळ्यावर.....

लेऊनी हिरवी साडी चोळी गोट,
पाटल्या, नथ, बुगडी, बाळी ।
अक्षय तृतियेला गौरीची ओटी भरुया ग,
ओटी भरुया... ५ ॥
हिंदोळ्यावर.....

- सौ. प्रीती मोडक

चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे नाशिकरोड येथे गुढीपाडवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कु. श्रेया सोंडूर, ठाणे - गायन (नाट्य-भावगीते)

शनिवार दिनांक २१/३/२०१५ रोजी सायं. ६.३० वा. ताराराणी सभागृह, शाहूनगर, नासिकरोड येथे.

तरी सर्व सभासद बंधू-भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

कार्यक्रमानंतर सुरुची भोजनाची खास व्यवस्था.

**अहो जोशी..देशपांडे..कुलकर्णी..कानेटकर**
ब्राह्मण स्थळासाठी विश्वासपात्र
फक्त एकच वेबसाईट
**www.saptpadi.com**
वर नाव नोंदवा आणि फोटो पत्रिकेसह
असंख्य स्थळ घरबसल्या निवडा...!
**हर्षल पुजारी यांचे**
**सप्तपदी डॉट कॉम**
- रजि. ऑफिस -
८, उदय प्लाझा, सितागुंफा समोर, पंचवटी, नाशिक.
फोन : ०२५३-२५१३०९८ मोबाईल : ९४२२७४८३३४
**सौ. सविता जोशी**
इंदिरानगर, नाशिक. फोन : ०२५३-२३२८३९०
**महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश येथील भरपूर स्थळे !**

# माहित असावे असे
# अक्षरे उलट लिहिणारा - मनिष भानू

अनेकांना मराठीही धड लिहिता येत नाही. सरळ लिहिणं आणि सुवाच्च लिहिणं तर दूरच. पण हा कलाकार चक्क सर्व अक्षरे उलटी उलटी लिहित जातो. तोच कागद घेऊन आपण आरशात पाहिले तर ती अक्षरे सुलटी दिसतात. आपण मराठी जसे सराईतपणे लिहितो तसे तो लिहित जातो आणि बघणारा बघतच रहातो. असाच आपली ही स्मार्ट आर्ट जपणारा मनीष भानू. आज जाणून घेऊ या त्याच्या या स्मार्ट आर्टविषयी...



मनीष एकदम साधा सरळ मुलगा. खरंतर त्याच्याकडे पाहून त्याच्यात अशी काही जगावेगळी कला दडलेली असेल असे वाटतही नाही. पण तो बसल्या बसल्या लिहित जातो आणि बघणाऱ्यांना अवाक्‌ करीत राहतो. कानडे मारुती लेनमध्ये राहणाऱ्या मनीषचे पगडबंद लेनमध्ये सौंदर्य प्रसाधनाचे एक प्रसिद्ध दुकान आहे. त्यांचा हा परंपरागत आलेला व्यवसाय आहे. एकीकडे हा व्यवसाय आणि दुसरीकडे ही कला. थोडं गोंधळायला होतं. पण मुळातच ही कला आली कुठून याला मनीष फार गंमतीदार उत्तर देतो. तो म्हणतो मुळातच प्रत्येकाला अभ्यास करण्याचा प्रचंड कंटाळा असतोच. मलाही असाच कंटाळा होता. पण आई-बाबा सारखे म्हणायचे अरे अभ्यास कर... अभ्यास कर.... एक दिवस मी असाच अभ्यास करताना पानांशी खेळत होतो. पान दुमडले आणि दिसले ‘उलटे अक्षर’. त्या वयात मला त्या अक्षरांबद्दल फार अप्रुप वाटलं. मी ती गिरवू लागलो. मग काय, मला त्या अक्षरांचं वेडंच लागलं. मग मी भरपूर लिहू लागलो. यातून माझा तर सरावच होत गेला. आधी मी उलटं अक्षरही आपण जसे नेहमी लिहितो तसेच लिहायचो. पण नंतर मला कळलं की, उलटं लिहिताना उजवीकडून डावीकडे लिहिलं तर ती अक्षरे एकदम बरोबर येतील. मग मी तशी अक्षरे लिहू लागलो आणि आरशात बघू लागलो. मला मजा येत होती. आई-बाबांनाही हे कळल्यावर त्यांनाही कौतुक वाटलं. मी इयत्ता पाचवीपासून लिहितो. आज १६ वर्षे झाली लिहितोय.

आता पूर्ण सराव झाला. मी मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेतही लिहू शकतो. या कलेसाठी मला वेगळं काहीतरी करायचं होतं. पण मधल्या काळात माझे बाबा गेले. त्यामुळे मग नाही म्हटलं तरी थोडी जबाबदारी माझ्यावर आली आणि मी दुकानकामात गुंतत गेलो आणि माझ्यातली ही कला थोडी मागे पडली. दुर्लक्ष झालं. म्हणजे माझं लिहिणं बंद नाही झालं पण, याच्यासाठी मी जास्त काही करू शकलो नाही. कधी कधी तर मी दुकानातील ऑर्डरही उलट्या अक्षरांनी लिहितो. एकदा काय झाले, दहावीला प्रिलिमच्या पेपरचे शेवटचे पान सरळ लिहिता लिहिता मी उलट उलटंच लिहित गेलो होतो. सरांना जेव्हा कळलं तेव्हा बोलणीही खावी लागली होती. अशा अनेक गमतीजमती घडतात. मला आठवतं मी खूप दिवसांपूर्वी एक कथा अशी उलट्या पद्धतीने लिहिली होती. ती कथा साधीच होती. माझं लहानपण, मोठा कसा झालो अशी ; पण तेवढंच काय ते मी लिहून ठेवलं आहे. गंमत म्हणून सांगतो, आपली गुपितं कोणालाही कळू नये असे वाटत असेल तर मग उलटं लिखाण बेस्ट. पण आता मी या कलेकडे लक्ष देणार आहे. कोणाला शिकायचं असेल तर शिकविणार आहे. कारण ती काहीच अवघड नाहीये. फक्त सराव महत्त्वाचा आहे.




**जॉईंटस् क्लिनिकमधील उपलब्ध सुविधा**
- जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन्स द्वारा वैद्यकिय सल्ला
- सर्जरीसाठी खास ऑपरेशन थिएटर्स – ल्यामिनर एअर फ्लो सहित मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर
- वेदना–विरहित सर्जरी
- ऑपरेशन नंतर जलद सुधार होण्याकरिता आधुनिक उपचार यंत्रणा व आधुनिक फिजियोथेरपी सेवा
- अद्यावत I.C.U. सुसज्ज पॅथॉलॉजी, आधुनिक डायग्नोस्टिक व इमेजिंग सुविधा तसेच २४ तास उपलब्ध फार्मसी
- पेशंटस्साठी जॉईंटस्च्या देखरेखी विषयक नियमित माहिती सत्र

**प्रारंभिक तपासणी फक्त ₹ ३००/- यामध्ये समाविष्ट**
- जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन द्वारा एक तपासणी
- एक मोफत फिजियोथेरपी सेशन
- एक एक्सरे (सल्ल्यानुसार)

जॉईंट्स क्लिनिक
दर शनिवार
स. १० ते सायं. ५

**प्रारंभिक ऑफर**
विशेष डिस्काउंटसह संपूर्ण जॉईंट रिप्लेसमेंट पॅकेजेस्
एका गुडघ्यासाठी ₹ ५५,०००/-* फक्त (+ इम्प्लान्ट)

* अटी लागू

**अधिक माहितीसाठी संपर्क : सचिन : ०७७६८००३७५७**

***सह्याद्रि स्पेशालिटी हॉस्पिटल*** *नाशिक*
मुंबई-आग्रा रोड, द्वारका सर्कल जवळ, वडाळा रोड, नाशिक - ४२२ ००१
फोन : ०२५३ - ६६९१ ६६६ | आपत्कालीन वैद्यकिय सेवा : ८८८८८ २२२२२
www.sahyadrihospital.com

॥ उद्योगेन हि सिध्यन्ति ॥

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक

काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक - ४२२ ००२.

दूरध्वनी : ०२५३-२३१३७०९

## ठेवीवरील व्याजदर तक्ता - २८/८/२०१४ पासून

| | | व्याजाचा दर | प्रकार |
|---|---|---|---|
| ● बचत खाते | - | ४.०० % | ६ महिने |
| ● ३० दिवस ते १८० दिवस | - | ७.०० % | सरळ व्याज |
| ● १८१ दिवस ते १२ महिने | - | ९.०० % | सरळ व्याज |
| ● १३ महिने ते २४ महिने | - | १०.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● २५ महिने ते ३६ महिने | - | १०.५० % | चक्रवाढ व्याज |
| ● ३७ महिने ते ९५ महिने | - | ९.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● दामदुप्पट योजना ९६ महिने | | | |

१३ महिने व त्यावरील मुदतीस ०.५०% जादा व्याज ज्येष्ठ नागरिकांकरीता

**● विशेष ठेव योजना : १२ महिन्यांसाठी ११.००% सरळव्याज सर्व वयोगटासाठी ●**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस्, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक-२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक - ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**फोन - चित्तपावन : २५०११०७, गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

● Website : www.nasikchitpavan.org

● Email ID : nasikchitpavan@gmail.com

● http:\\twitter.com\nasikchitpavan

● http:\\facebook.com\nasikchitpavan

● http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. चित्तपावन मित्र च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.